खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र २

## विषय

## व्यावसायिक नितीमुल्ये-II

## प्रकरण-३

# कार्पोरेट गव्हर्नन्स आणि व्यावसायिक नीतिमूल्ये

# प्रकरण-३

# कार्पोरेट गव्हर्नन्स आणि व्यायसायिक नीतिमूल्ये

## संकल्पना ( Concepts )

गेल्या 25 - 30 वर्षांमध्ये भारतात अनेक बदल झाले . 1991 साली जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण ही धोरणे स्वीकारली. त्यातील उदारीकरण धोरणामुळे केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडील जबाबदाऱ्या Corporate तसेच खासगी क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणावर संपत्ती निर्माण करणारे , रोजगारनिर्मिती करणारे , उत्पादन करणारे आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे क्षेत्र म्हणून या क्षेत्रांकडे पाहिले जाऊ लागले . व्यवसायाचे आर्थिक उद्दिष्ट ( जास्तीत जास्त नफा मिळविणे ) साध्य करण्याबरोबरच एका बाजूला कंपन्यांना तीव्र स्पर्धांना तोंड द्यावे लागते .

## कार्पोरेट गव्हर्नन्सची पार्श्वभूमी

कोणताही व्यवसाय हा नफा मिळविण्याच्या उद्देशानेच स्थापन झालेला असतो . नफा मिळविण्याचे उद्दिष्ट साध्य करताना ज्या घटकांच्या सहभागामुळे आपण आपले आर्थिक उद्दिष्ट साध्य करतो त्या घटकांनाच अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते . असे होऊ नये म्हणून सर्वप्रथम इंग्लंडमध्ये 1992 साली कॅडबरी समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला . या अहवालामध्ये कंपन्यांनी कोणत्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे हे नमूद केले आहे .

## अर्थ

कापारट गव्हर्नन्स म्हणजे कंपनीच्या व्यवस्थापनातील सर्व घटकाच्या ( भागधारक , कपनीला अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था . बँका . ठेवीदार , कच्च्या माला पुरवठादार , ग्राहक , सरकार , समाज इत्यादी हितांचा विचार करून चालविण्याची पद्धती होय . कापारट गव्हर्नन्स हे एक असे तंत्र आहे की , ज्याद्वारे कंपन्या निर्देशित आणि व्यवस्थापित केल्या जातात .

## व्याख्या

"कार्पोरेट गव्हर्नन्स म्हणजे कंपन्यांनी ऐच्छिकरीत्या स्वीकारलेली मूल्यांवर आधारित आचारसंहिता होय . ”

## कार्पोरेट गव्हर्नन्सची व्याप्ती

कार्पोरेट कारभाराच्या व्याप्तीचे केंद्रबिंदू हे त्यांचे भागधारक , संचालक मंडळ आणि व्यवस्थापन मंडळ आहेत .

( 1 ) भागधारक :

भागधारक त्यांच्या वतीने कार्य करण्यासाठी संचालक नियुक्त करतात . हे नियुक्त केलेले संचालक व्यवस्थापन तसेच कंपनीबाबतचे निर्णय घेतात . जे कंपनीच्या कारभारांतर्गत थेट जबाबदार असतात . भागधारक वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे महत्त्वपूर्ण कार्यसूची पुढे आणू शकतात . तसेच कंपनीच्या कार्यवाहीच्या प्रक्रियेवर महत्त्वपूर्ण परिणाम देणाऱ्या मुद्द्यांवरून मतदानाद्वारे योजना आणि धोरणांना मंजुरी देऊ शकतात .

( 2 ) संचालक मंडळ :

हे कार्पोरेट कारभारासाठी अत्यंत जबाबदार आहे . कंपनीचा दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी संचालक मंडळ एका मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची ( CEO ) नेमणूक करतात . हा अधिकारी संचालक मंडळाने नेमून दिलेल्या प्रशासकीय चौकटीत कंपनीचे कामकाज पाहतो . उदा . , संचालक मंडळ कंपनीची दीर्घकालीन ध्येये . उद्दिष्टे ठरविते . ही उद्दिष्टे साध्य करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची असते . कंपनीचा व्यवहार सुरळीतपणे चालविण्यासाठी त्याला कंपनीतील विविध विभागांच्या ताल विविध विभागांच्या व्यवस्थापकांची मदत घ्यावी लागते .

( 3 ) बाहय लेखापरीक्षक :

कार्पोरेट गव्हर्नन्समध्ये बाह्य लेखापरीक्षकांचीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका असते . कंपनीमधील संभाव्य फसवणूक , त्रुटींची तपासणी करून कंपनी सुरळीत कार्य करीत असल्याचे सुनिश्चित करणारे तेच असतात . यांच्यामुळे कंपनीतील अनुचित प्रकार वेळीच उघडकीस येऊन कंपनीवर अवलंबून असणाऱ्या सर्वच घटकांची फसवणूक होण्यापासून बचाव होतो .

( 4 ) सेबी ( SEBI ) :

सार्वजनिक कंपन्यांच्या भागभांडवलावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच भागधारकांच्या हितरक्षणासाठी सेबीने अनेक नियम व बंधने घातलेली आहेत. या नियमांचे पालन करणे कंपनीवर बंधनकारक असते . कार्पोरेट गव्हर्नन्समुळे अनेक गैरव्यवहारांना आळा बसतो .

( 5 ) कायदा :

कायद्यांद्वारे कंपनीच्या व्यवहारावर अंकुश ठेवता येतो . कंपन्यांना कर भरणे , वेळच्या वेळी लेखापरीक्षण करून घेणे , परवान्याचे नूतनीकरण करून घेणे इत्यादीं विषयी शासनाने जी नियमावली केली आहे तिचे पालन कार्पोरेट गव्हर्नन्समुळे केले जाते .

( 6 ) समाज :

कंपनीमुळे समाजाचा विकास झाला पाहिजे , काळाबाजार , टंचाई , भेसळ अशा अनुचित प्रकारांपासून संरक्षण झाले पाहिजे . कंपन्यांनी समाजाच्या विकासासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत . नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला पाहिजे , पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे इत्यादी गोष्टी चांगल्या कार्पोरेट गव्हर्नन्स मुळे समाजामध्ये उपलब्ध होऊ शकतात .

( 7 ) इतर घटक :

कंपनीच्या कारभारामध्ये थेट कार्यरत असणारे कर्मचारी , कामगार , पुरवठादार , वितरक , घाऊक व किरकोळ विक्रेते , ग्राहक , उपभोक्ते इत्यादी प्रभावी घटक म्हणून ओळखले जातात . कार्पोरेट गव्हर्न्र्ससमुळे त्यांच्याही हितसंबंधाचे रक्षण होते .

## <u>कार्पोरेट गव्हर्नन्सची उद्दिष्टे</u>

(1) पारदर्शकता आणि प्रकटीकरण ( Transperency and Disclousure ) :

चांगल्या कार्पोरेट गव्हर्नन्सचे उद्दिष्ट कंपनीच्या व्यवहारात पारदर्शकता ठेवणे तसेच व्यवहाराविषयी खरी माहिती संबंधित घटकांना देणे . । उदा . , कंपनीचे आर्थिक निर्णय हे कंपनीने भागधारकांना सांगितले पाहिजेत . तसेच आपल्या उत्पादनात काही बदल केले असल्यास तशी माहिती ग्राहकांना दिली पाहिजे .

(2) उत्तरदायित्व ( Accountability ) :

कंपनीच्या वरिष्ठ स्तरावरील व्यक्तींनी कंपनीच्या गुंतवणूकदारांप्रति असलेल्या उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कंपनीचे कामकाज उत्कृष्ट पद्धतीने चालविणे , त्यासाठी योग्य नियोजन करणे , योग्य निर्णय घेणे .

(3) सर्व गुंतवणूकदारांना समान वागणूक ( Equitable Treatment of Investors ) :

कंपनीला आर्थिक मदत करणाऱ्या सर्वच गुंतवणूकदारांप्रति आदराची भावना ठेवणे , त्यांच्या विश्वासास तडा जाणार नाही याची काळजी घेणे , सर्व गुंतवणूकदारांना समान वागणूक देणे.

(4) स्वयं - मूल्यांकन ( Self - Evaluation ) :

नियामक मंडळाकडून मूल्यांकन करून घेण्यापूर्वी स्वयं - मूल्यांकन करून कंपनीच्या व्यवहारातील चांगल्या , वाईट गोष्टी शोधून काढणे . व्यवहारात आढळलेल्या त्रुटींचे निराकरण करण्यासाठी उपाय शोधून काढणे .

(5) भागधारकांच्या संपत्तीत वाढ करणे ( Increasing Shareholder ' s Wealth ) :

भागधारकांनी विश्वासाने आपले उत्पन्न कंपनीच्या भागांमध्ये गुंतविलेले असते . त्यांच्याही कंपनीकडून अपेक्षा असतात . कंपनीला पुरेसा नफा झाल्यानंतर भागधारकांना वेळेवर लाभांश देणे , बोनस भाग देणे इत्यादीतून त्यांच्या संपत्तीत वाढ घडवून आणणे .

**<u>वैशिष्ट्ये ( Features )</u>**

( 1 ) पारदर्शकता ( Transparency ) :

कार्पोरेट गव्हर्नन्समुळे कंपनीच्या व्यवहारात पारदर्शकता येते . पारदर्शकता म्हणजे कोणत्याही प्रकारची गोपनीयता न बाळगता आवश्यक ती माहिती संबंधित घटकांना पुरवली पाहिजे .

( 2 ) भागधारकांच्या हक्कांचे संरक्षण :

भागधारकांनी केलेल्या गुंतवणुकीवर त्यांना वेळेवर परतावा मिळेल , त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे . त्यांचे हितसंरक्षण केले पाहिजे .

( 3 ) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जास्त अधिकार :

कंपनीचे संचालक मंडळ हे कंपनीची दीर्घकालीन ध्येयधोरणे ठरविण्याविषयीचे निर्णय घेते . परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे कार्य हे CEO लाच करावे लागते .

वरिष्ठांनी आखून दिलेल्या चौकटीत राहून इतर अधिकाऱ्यांच्या मदतीने कंपनीचे जास्तीत जास्त नफ्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्याला जादा अधिकार दिले पाहिजेत .

( 4 ) उत्तरदायित्व :

संचालक मंडळ , मुख्य कार्यकारी अधिकारी , व्यवस्थापक यांनी आपल्याला नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितरीत्या पार पाडल्या पाहिजेत .

( 5 ) नैतिकता :

कंपनीचे आर्थिक उद्दिष्ट साध्य करताना कंपनीने नैतिकता व मूल्यांचा आधार घेऊन आपला कारभार चालवावा , जास्त नफ्याच्या हेतूने कोणतेही अनुचित प्रकार , गैरव्यवहार यांचा अवलंब करू नये .

( 6 ) स्वीकारार्हता :

कंपनीने नफ्याचे उद्दिष्ट साध्य करताना समाजाचा तसेच देशाचा विचार करणे गरजेचे आहे . कार्पोरेट गव्हर्नन्स ही व्यापक संकल्पना असून ती आता सर्वमान्य झाली आहे . त्यामुळे सर्व कंपन्यांनी या संकल्पनेचा स्वत : हून स्वीकार केला पाहिजे व कार्पोरेट गव्हर्नन्सने आखून दिलेल्या चौकटीत काम केले पाहिजे .

(7 ) पद्धतशीरपणा :

कार्पोरेट गव्हर्नन्स ही कायदे , कार्यपद्धती , नियम इत्यादींवर आधारित एक पद्धतशीर संकल्पना आहे . हे सर्व नियम आणि कायदे हे व्यवसायाशी संबंधित घटकांची संपत्ती वाढण्यासाठी , सर्व घटकांच्या हितसंबंधांचे , हक्कांचे संरक्षण करण्यासाठीच बनविलेले आहेत.

## चांगल्या कार्पोरेट गव्हर्नन्सची मूलभूत तत्त्वे ( Core Principles of Good Governance)

( 1 ) समान वागणूक ( Fairness ) :

यामध्ये सर्व भागधारकांना समान वागणूक देणे अपेक्षित आहेच परंतु कंपनीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जे - जे घटक समाविष्ट आहेत . उदा . , पुरवठादार , कर्मचारी , अधिकारी वर्ग , ग्राहक यांनाही समान वागणूक देणे गरजेचे आहे .

( 2 ) उत्तरदायित्व ( Accountability ) :

उत्तरदायित्व म्हणजे कंपनीने आपल्या कृतींचे , व्यवहारांचे स्पष्टीकरण देण्याचे बंधन किंवा जबाबदारी होय . यामध्ये संचालक मंडळाने आपल्या कंपनीचे स्थान आणि

भविष्यातील योजनांचे स्पष्टीकरण सर्वांना समजेल असे सावर केले पाहिजे .तसेच या मंडळाने कंपनीत जोखीम व्यवस्थापन आणि अंतर्गत नियंत्रणप्रणाली राखली पाहिजे.

( 3 ) जबाबदारी ( Responsibility ) :

संचालक मंडळाला कंपनीच्या वतीने कार्य करण्याचे अधिकार दिले जातात . म्हणूनच त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची आणि ते अधिकार वापरण्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे . संचालक मंडळाला पुढील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. कंपनीचे व्यवस्थापन करणे , कंपनीच्या कारभारावर देखरेख ठेवणे , मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करणे , कंपनीच्या कामगिरीवर ( यशावर ) देखरेख ठेवणे आणि हे सर्व करताना कंपनीच्या हितासाठी कार्य करणे आवश्यक आहे .

(4) पारदर्शकता ( Transparency ) :

चांगल्या कारभाराचे एक तत्त्व म्हणजे कंपनीच्या व्यवहारातील पारदर्शकता . कंपनीने भागधारकांना ( Shareholders ) आपल्या भविष्यातील योजना , धोरणे यांच्याबद्दल माहिती दिली पाहिजे . त्या योजनांची अंमलबजावणी कशी केली जाणार आहे , अंमलबजावणी करताना संभाव्य धोके कोणते असणार आहेत या सर्वांची स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे . पारदर्शकता म्हणजे सत्य आणि अचूक माहिती उघडपणे सादर करणे होय . यामुळे Shareholders चा कंपनीवरील विश्वास वाढण्यास मदत होते .

**चांगल्या गव्हर्नन्सचे फायदे | ( Advantages / Benefits of Good Governance )**

कंपनी कारभारामुळे कंपनीतील गैरव्यवहारांना आळा घातला जातो . चांगल्या कंपनी कारभारामुळे कंपनीला पुढील फायदे मिळतात .

1. चांगले कार्पोरेट गव्हर्नन्स हे व्यवसायाला यश मिळवून देते .
2. उद्योगाची आर्थिक स्थिती उंचावते .
3. गुंतवणूकदारांचा उद्योगाप्रती विश्वास वाढतो .
4. कंपनी कार्यक्षमतेने व प्रभावीपणे भांडवल वाढवू शकते .
5. गुंतवणूकदारांचा प्रतिसाद मिळतो . त्यामुळे उद्योगाचा विस्तार सहज शक्य होतो . '
6. उद्योगाच्या भागांच्या किमतीवर याचा सकारात्मक परिणाम होतो .

7. भांडवल उभारणीचा खर्च कमी होतो .

8. उद्योगामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या उद्योगाच्या कार्यक्षम व्यवस्थापनाची खात्री पटते , त्यांचा आत्मविश्वास , मनोधैर्य वाढते . ते अधिक उत्साहाने काम करतात .

9. उद्योगाची कार्यक्षमता वाढते . कंपनीचा नावलौकिक वाढतो .

10. ग्राहकांना वाजवी किमतीत दर्जेदार वस्तू उपलब्ध होतात .

11. त्यांचे राहणीमान उंचावते .

12. समाजाच्या व राष्ट्राच्या विकासास चालना मिळते .

**<u>कापरिट गव्हर्नन्सची ( C . G . ) ची आवश्यकता</u>**

कार्पोरेट गव्हर्नन्सची ( C . G . ) ची आवश्यकता पुढील घटकांमुळे निर्माण झाली .

(1) विखुरलेले भागधारक ( Wide Spread of Shareholders ) :

कंपनीच । भागधारक संपूर्ण देश आणि परदेशातही मोठ्या संख्येने आहेत . बहुतेक भागधारक असंघटित तसेच कार्पोरेट व्यवहारांबद्दल उदासीन असतात , भागधारकांना असलेल्या अधिकारांची कल्पना फक्त कायदा व कागदोपत्रीच मर्यादित आहे . बऱ्याच वेळा कार्पोरेट गव्हर्नन्सच्या आचारसंहितेबारे व्यावहारिक अंमलबजावणीची आवश्यकता असते .

(2) मालकीच्या रचनेत बदल ( Changing Ownership Structure ) :

संस्थात्मक गुंतणवूकदार आणि म्युच्युअल फंड मोठ्या कापरिट खासगी क्षेत्रातील मोठे भागधारक बनले आहेत . हे गुंतवणूकदार , कार्पोरेट व्यवस्थापनासाठी सर्वांत मोठे आव्हान बनले आहेत , कारण त्यांनी कापरिट गव्हर्नन्स कार्पोरेट गव्हर्नन्सच्या आचारसंहितेचे पालन करण्यास भाग पाडले आहे .

(3) कार्पोरेट क्षेत्रातील घोटाळे ( Corporate Scams or scandals ) :

भारतामध्ये 2009 साली कार्पोरेट क्षेचातील सर्वात मोठा घोटाला म्हणून सत्यम घोटाला ओळखला जातो . या कंपनीचे मालक रामलिंगम राज यांनी काही कर्मचान्यांच्या मदतीने सर्वात मोठी हिशेबात अफरातफर केली . कंपनीच्या वार्षिक अहवालात प्रचंड नफा वाचन गुतवणूकवारांना आकर्षित करून मोत्या प्रमाणात भांडवल गोळा केले .

गुतवणूकदारांना विश्वासात न घेता भांडवल इतर क्षेत्रात गंतविले . हे प्रकरण कंपनीतील कार्यकारी संचालक मंडळांनी एकत्रितरीत्या राजीनामे देऊन माध्यमांद्वारे उघडकीस आणले .

(4) कार्पोरेट क्षेत्राकडून समाजाच्या असणाऱ्या मोठ्या अपेक्षा ( Greater Expectations of Society by the Corporate Sector ) :

कार्पोरेट क्षेत्रामुळे समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास होतो , कार्पोरेट क्षेत्रालाही आपली उदिष्टे साध्य करण्यासाठी समाजाची मदत होते . समाज आणि कारिट क्षेत्र एकमेकांवर अवलंबून आहेत . वाजवी किंमत , उत्तम गुणवत्ता , प्रदूषण नियंत्रण , संसाधनांचा पर्याप्त उपयोग इत्यावी बाबतीत समाजाच्या कार्पोरेट क्षेत्राकडून मोठ्या अपेक्षा आहेत . या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी कंपनीच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी कार्पोरेट गव्हर्नन्सची आवश्यकता आहे .

(5) उच्च व्यवस्थापनाच्या आर्थिक मोबदल्यात प्रचंड वाढ ( Huge Increase in Top Management Compensation ) :

विकसित आणि विकसनशील बोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये दिसून आले आहे की , व्यवस्थापनाच्या उच्च स्तरावर कार्यरत असलेल्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आर्थिक मोबदल्यात ( पंकजेस ) मोठी वाढ झाली आहे .

(6) जागतिकीकरण ( Globalization ) :

आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात नोंदणी व्हावी अशी अनेक भारतीय कंपन्यांची इच्छा आहे . जर कंपनी कापरिट गव्हर्नन्सच्या आचारसंहितेनुसार व्यवस्थापन करत असेल तर आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात नौदणी होणे सोपे होते . म्हणून कार्पोरेट गव्हर्नन्सची आवश्यकता आहे .

**<u>कार्पोरेट गव्हर्नन्सच्या चांगल्या प्रणालीसंबंधी सेबीच्या मार्गदर्शक सूचना</u>**

चांगली कार्पोरेट गव्हर्नन्स प्रणाली संदर्भात सेबीच्या मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे :

**( अ ) संचालक मंडळ ( Board of Director ) :**

1 . कंपनीच्या संचालक मंडळामध्ये कार्यकारी ( Executive ) आणि कार्यकारी नसलेले ( स्वतंत्र ) ( Non - Executive ) संचालक या दोन्हींचा समावेश असावा .

2 अध्यक्ष , कार्यकारी संचालक आहेत की स्वतंत्र संचालक आहेत यावर स्वतंत्र ( Non Executive ) संचालकांची संख्या अवलंबून असते . कार्यकारी अध्यक्ष नसल्यास मंडळाच्या किमान एक - तृतीयांश स्वतंत्र संचालकांचा समावेश असावा . कार्यकारी अध्यक्ष असल्यास किमान एक - द्वितीयांश , संचालक असावेत .

**( ब ) ऑडिट समिती ( Audit Committee )** :

1 . यात कमीत कमी तीन सभासद असतील व ते सर्व स्वतंत्र संचालक असतील . त्यातील किमान एका संचालकाला आर्थिक व लेखाचे ज्ञान असावे .

2 . समितीचे अध्यक्ष स्वतंत्र संचालक असतील .

3 . वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद भागधारकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी ते हजर असले पाहिजेत .

**( क ) संचालकांचे मानधन ( Remuneration of Directors ) :**

संचालकांच्या मानधनाबाबत वार्षिक अहवालाच्या कार्पोरेट गव्हर्नन्स विभागात पुढील खुलासे करण्यात येतील .

1. वेतन, लाभ , बोनस , पेन्शन इत्यादी .

2. कार्यक्षमतेशी संबंधित असलेल्या प्रोत्साहनपर योजनांचा (Incentives ) तपशील .

**( ड ) मंडळाची कार्यपद्धती ( Board Procedure ) :**

1. मंडळाच्या बैठका वर्षातून कमीत कमी चार वेळा आयोजित केल्या जाव्यात . दोन बैठकांमध्ये जास्तीत जास्त 4 महिन्यांचे अंतर असावे .

2.संचालक 10 पेक्षा जास्त समित्यांचा सदस्य असणार नाही किंवा 5 पेक्षा अधिक समित्यांचा अध्यक्ष म्हणून काम करणार नाही .

**( इ ) व्यवस्थापन ( Management )** :

वार्षिक अहवालात व्यवस्थापनाच्या पुढील गोष्टींवर केलेल्या विश्लेषणाचा समावेश असावा

1. व्यवसायातील संधी आणि धोके

2. विभाग व उत्पादनानुसार कामगिरी

3. जोखीम आणि चिंता

4. कार्यपद्धती व आर्थिक कामगिरी यांच्या संबंधातील चर्चा इत्यादी .

**(फ ) भागधारक ( Shareholder )** :

1. नवीन संचालकांची नेमणूक केली असल्यास त्याचा संपूर्ण परिचय , तो पारंगत असलेल्या क्षेत्राचा उल्लेख .

2. सभासद , संचालकांची संख्या

3. भागधारक व गुंतवणूकदारांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापना.

**(ग) कार्पोरेट गव्हर्नन्सचा अहवाल :**

कंपनीच्या वार्षिक अहवालात कार्पोरेट गव्हर्नन्सचा स्वतंत्र विभाग असेल आणि सविस्तर अहवाल असेल . कार्पोरेट गव्हर्नन्सने ठरवून दिलेल्या नियमांचे , अटींचे पालन केलेल्या कंपनीला लेखा परीक्षकाकडून प्रमाणपत्र दिले जाईल . हे प्रमाणपत्र भागधारकांना पाठविलेल्या अहवालासोबत जोडले जाईल . तसेच स्टॉक एक्सेंजला पाठविले जाईल .

## व्हिसल ब्लोइंग ( शिट्टी वाजविणे ) :

### व्याख्या आणि अर्थ ( Definition and Meaning )

**व्याख्या=** "जेव्हा संस्थेतील एखादा माजी किंवा विद्यमान कर्मचारी संघटनेमध्ये चालू असलेल्या गैरकृत्याबद्दलकिंवा अनैतिक कृतींबद्दल आवाज उठवितो तेव्हा त्याला शिट्टी वाजविणे( Whistleblowing) असे म्हणतात . " ज्याने आवाज उठविला आहे त्याला व्हेसल ब्लोअर असे म्हणतात

### व्हिसल ब्लोइंगची कारणे ( Whisle Blowing Causes )

गैरप्रकारांबद्दल आवाज उठविणे म्हणजे व्हिसल ब्लोइंग हे आपण वर पाहिले . परंतु हा आवाज का उठवावा लागतो कोणाकडून गैरवर्तनाला आळा घालण्याचा प्रयत्न केला जातो त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

( 1 ) व्हिसल ब्लोअर्समधील प्रामाणिकपणा व न्यायाची भावना :

आपण ज्या कंपनीमध्ये काम करत आहोत त्या कंपनीत चालणारे व्यवहार हे प्रामाणिक व सचोटीने चालणारे असावेत . आपल्या कंपनीबद्दल आपल्याला तसेच इतरांनाही आदर

वाटावा , अभिमान वाटावा असे प्रत्येक प्रामाणिक कर्मचाऱ्याला वाटते . परंतु कंपनीच्या व्यवहारात जेव्हा काही चूक दिसते तेव्हा अशा कर्मचाऱ्यांना स्वस्थ बसणे किंवा बघ्याची भूमिका घेणे अशक्य असते . त्यांच्यातील प्रामाणिकपणा , त्यांचा न्याय्य स्वभाव त्यांना स्वस्थ बसून देत नाही . असे कर्मचारी व्हिसल ब्लोअर्स होतात .

( 2 ) सकारात्मक बदल होण्याची इच्छा :

व्हिसल ब्लोअर नेहमी सकारात्मक बदलाचा शोध घेतात . ज्या कंपनीसाठी काम करत आहोत त्या कंपनीच्या कामाच्या दर्जाचा आलेख हा नेहमी वरच्याच दिशेने असावा असे त्यांना वाटत असते . ते ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणी काम करण्याचा त्यांना सार्थ अभिमान असतो . ही कंपनी आहे म्हणून आपण आहोत , ही आदराची भावना असते . त्यामुळे कंपनीबद्दल त्यांना आपुलकीही वाटते . अशा कंपनीत जेव्हा चुकीचे काही घडत आहे हे दिसते तेव्हा शांत राहणे म्हणजे कंपनीचा विश्वासघात केल्यासारखे आहे याची जाणीव होऊन असे कर्मचारी व्हिसल ब्लोअर्स होतात .

( 3 ) गैरप्रकारांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासून इतरांना संरक्षण मिळाव हा भावना :

कंपनी किंवा व्यवसायसंस्थेवर समाजातील अनेक घटक अवलंबून असतात हे आपण वर अभ्यासले आहेच . गैरप्रकार म्हणजे - मालामध्ये भेसळ करणे , कमी दर्जाचा कच्चा माल वापरणे , हिशेबामध्ये फेरफार करणे , पैशांची अफरातफर करणे , मालाची चोरी करणे , गुंतवणूकदारांकडून जमा केलेल्या ठेवी / भांडवल इतर कामांसाठी वापरणे इत्यादी या सर्वांचा किंवा यातील काही चुकीच्या गोष्टींचा समाजातील घटकांवर दुष्परिणाम होतो . समाजाला अशी हानी पोहोचू नये , समाजातील घटकांचे अशा अनिष्ट मार्गापासून संरक्षण व्हावे असे जेव्हा कर्मचाऱ्यांना वाटते अशा वेळी ते व्हिसल ब्लोअर्स होतात .

( 4 ) धाडसीपणा :

आपण व्हिसल ब्लोअर्स झाल्यानंतर आपल्याला बऱ्याच गोष्टींना सामोरे जावे लागेल . उदा . , नोकरी गमाविणे , दूरच्या ठिकाणी बदली होणे , जीव धोक्यात येणे इत्यादी या परिणामांची जाणीव असूनही अन्याय सहन करण्यापेक्षा वरील परिणामांना सामोरे जाण्याची धाडसी वृत्ती ज्या कर्मचाऱ्यांमध्ये आहे असे कर्मचारी व्हिसल ब्लोअर होत

## व्हिसल ब्लोइंगचे प्रकार

**( 1 ) अंतर्गत व्हिसल ब्लोईंग** :

यामध्ये कंपनीतील कर्मचारी आपल्या संस्थेतील पदावर असलेले अधिकारी किंवा आपल्या वरिष्ठांना कंपनीत चाललेल्या गैरवर्तनाबद्दल माहिती देतो .

**( 2 ) बाह्य व्हिसल ब्लोईंग** :

यामध्ये कंपनीतील कर्मचारी आपल्या कंपनीत चाललेल्या गैरवर्तनाबद्दल कंपनीशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना माहिती देतो . उदा . , एखादी कायदेशीर संस्था , वकील .

## लेखंकानाबाबत(accounting) व्यवसायिक नीतिमूल्य

( 1 ) सचोटी ( Integrity ) :

आपले जमा - खर्च मांडताना ते प्रामाणिकपणे सत्य असलेले लिहावेत .

( 2 ) उद्दिष्टता ( Objectivity ) :

लेखापालाने आपले काम करताना कुणाच्या प्रभावाखाली येऊन करू नये तर नि : पक्षपातीपणे करावे . आकडेवारी आणि परिणाम दर्शनी मूल्यांवर आधारित असावेत . त्यावरून निष्कर्ष व निर्णय घ्यावेत .

( 3 ) व्यावसायिक क्षमता व देय काळजी ( Professional Competence and Due Care ) :

ग्राहकांना , गुंतवणूकदारांना अद्ययावत माहिती व सर्वोत्तम गुणवत्तेची सेवा प्रदान करणे ही लेखापालाची नैतिक जबाबदारी आहे .

( 4 ) गोपनीयता ( Confidentiality ) :

लेखापाल सर्वांत संवेदनशील माहिती हाताळतात . या माहितीचा स्वत : च्या स्वार्थासाठी गैरवापर करू नये . तसेच माहितीचा गैरवापर करणाऱ्यांना देऊ नये .

( 5 ) व्यावसायिक वर्तन ( Professional Behaviour ) :

लेखापालाने व्यावसायिक मानकांकडे लक्ष देऊन कामे आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्यात . यामध्ये कामे वेळेत पार पाडणे , वचनबद्धतेचे पालन करणे इत्यादींचा समावेश होतो .

**<u>प्रसारमाध्यमे ( Social Media )बाबतव्यवसायिक नीतिमूल्य</u>**

प्रसारमाध्यमे ही मानवाला जगाशी जोडणारे प्रभावी माध्यम आहे . देशातील , परदेशातील नवीन घडामोडींची माहिती प्रसारमाध्यमांद्वारे मिळते म्हणून प्रसारमाध्यमांनी पुढील तत्त्वांचा अवलंब करणे अनिवार्य आहे .

( 1 ) प्रामाणिकपणा ( Authenticity ) :

माहिती सादर / प्रसिद्ध करताना प्रामाणिकपणे व सत्य असलेली सादर करावी त्यामुळे लोकांचा विश्वास बळकट होऊन लोक सकारात्मक प्रतिक्रिया देतील .

( 2 ) पारदर्शकता ( Transparency ) :

कोणत्याही प्रकारची माहिती न लपविता ती सादर करणे आवश्यक

3/) संदेश वहन-एकमेकांशी संवाद साधण्याचे कार्य संदेशवहनात द्वारे होते लोकांच्या प्रक्रि यांचा आदर करणे. त्यांना प्रतिसाद देणे या गोष्टी प्रभावी संदेश वाहनाद्वारे वेळेवर करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे एखाद्याचे प्रतिमा बनवू किंवा तोडू शकतात. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी संदेशवहन याबाबत सुद्धा काही व्यवस्थित नीतिमूल्य पाळली पाहिजेत.

**<u>माहिती तंत्रज्ञानाबाबत नीतिमूल्य</u>**

नैतिकतेची काही मानके पुढील प्रमाणे

**1.** सुरक्षितता-

ई कॉमर्स साईटपासून बँकिंग आणि सरकारी डेटाबेसपर्यंत लोकांना असा विश्वास असतो. की आपली माहिती आपण पासवर्ड टाकलाय म्हणजे सुरक्षित आहे परंतु पासवर्ड आहेत. होऊन माहितीचा गैरवापर करून लोकांच्या आर्थिक नुकसान झाल्याची अनेक उदाहरणे परिचित आहेत. त्यामुळे याबाबत सुरक्षितता पाळणे आवश्यक आहे.

**2.** प्रोप्रायटरी सॉफ्टवेअर-

काही सॉफ्टवेअर हे खासगी संस्थांच्या खासगी हेतूसाठी बनविले असतात ते कायदेशीर मान्य करून घेतले जात नाहीत. अशा सॉफ्टवेअरच्या माध्यमातून लोकांची फसवणूक केली जायची शक्यता असते. झालेले घोटाळे लक्षात आल्यास जाणे गैरवापर केला आहे त्यास नोकरीवरून कमी केले जाते

**3.** सखोल शिक्षण व कृत्रिम बुद्धिमत्ता-

या तंत्रज्ञानामुळे एका जागेवर बसून अनेक गोष्टींचे नियंत्रण करण्याच्या सुविधा मिळू लागल्या आहेत. कारचे क्रुज नियंत्रण विमानातील सुरक्षितता यंत्रणा पासून स्मार्ट टीव्ही वर बाहेर कोण पाहुणे आले आहेत, हेही दरवाजा न उघडता दिसू शकते, परंतु हे तंत्रज्ञानही पूर्ण सुरक्षित नाही.

**4.** पालकांचे अज्ञान-

स्मार्टफोनचा वापर करणारे तरुण पिढी फोनच्या चांगल्या उपयोगासाठी जेवढा वापर करतात. त्यापेक्षा जास्त वापर वाईट माहिती मिळवण्यासाठी करतात स्मार्टफोन मधील वेगवेगळ्या जेवढी माहिती पालकांना नाही तेवढी लहान मुले शोधून काढून त्या ॲप्स मधल्या गोष्टींचे अनुकरण करतात. यातील बऱ्याच गोष्टी या त्यांच्यासाठी तसेच समाजासाठी हानिकारक आहेत.

## <u>विपणन आणि जाहिरात क्षेत्रातील नीतिमूल्ये</u>

### 1. किंमत-

जास्तीत जास्त किरकोळ किंमत ठरविताना वस्तुस्थितीचा विचार व्हावा आणि त्यापेक्षा जास्त किमतीला मालाची विक्री केली जाणार नाही हे पाहिले पाहिजे. मालाचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून ग्राहकाला जास्त किमतीचा करून माळ विक्री करणे नीतिमूल्यांचा विरोधी ठरते. ग्राहक किती किंमत देऊ शकतो किंवा त्यांच्या इच्छेनुसार किंमत करण्यापेक्षा उत्पादन खर्चावर आधारित किंमत आकारणे संयुक्तिक ठरेल.

### 2. वस्तूंचा दर्जा-

उत्पादित वस्तूंचा दर्जा चांगला ठेवून त्यात सातत्य टिकविणे, ही उत्पादकाची जबाबदारी आहे एखाद्या उत्पादनात दोष आहे हे उत्पादकाला माहिती असूनही केवळ प्रसिद्ध उत्पादन किंवा बाजारपेठेत पूर्वी यशस्वी ठरले आहे. म्हणून विकणे म्हणजे ग्राहकांची

फसवणूक होय व्यवसायाच्या स्वीकारली तत्वे सरकारी नियंत्रणे व समाजाची बांधिलकी याची जाणीव ठेवावी.

### 3. वितरण साखळी-

विक्रीच्या पद्धतीमध्ये वितरकांनी काही मुले पाळली पाहिजेत इतरांना कमी लेखून मालाची विक्री करू नये. विक्रेते ते अनेक उत्तेजन योजना व सवलती जाहीर करतात भेट योजना कशा स्वरुपाची व तिची व्याप्ती किती ठेवावी याला मर्यादा असावी या मर्यादा पाळल्या नाहीत तर स्पर्धेमध्ये या बाबींवर खर्च वाढतो व कुठल्याही पातळीपर्यंत विक्री पद्धती जाते

### 4. विक्रयोत्तर सेवा-

विक्रेत्याने वस्तू विकल्यावर आणि वस्तूची संपूर्ण रक्कम मिळाल्याबरोबर विक्रेत्याची जबाबदारी संपत नाही. यंत्रसामग्री उपकरणे इत्यादींबाबत वाजवी किमतीत सुटे भाग पुरविणे यंत्र दुरुस्ती वेळेवर करून देणे ही विक्री त्यांची जबाबदारी आहे.

### 5. स्पर्धा-

ग्राहकांच्या मागणीचा वआवडी-निवडीचा शोध घेण्यासाठी बाजारपेठेचे संशोधन हाती घेतले जाते. स्पर्धाही मुक्त व्यापार पद्धतीचा एक अविभाज्य भाग आहे. मक्तेदारीयुक्त परिस्थिती निर्माण केल्यामुळे स्पर्धेचे महत्त्व कमी होते. स्पर्धेवर नियंत्रण आणणारा दुसरा घटक म्हणजे उत्पादकांच्या छोट्या गटाने संगनमताने सामुदायिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी बाजारपेठ विभागून घेणे व किंमती निश्चित करणे.

---

### संदर्भ ग्रंथ

१. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- प्राचार्य – डॉ. प्रसन्न कुमार देशमुख आणि सहकारी प्रध्यापक

२. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- डॉ. डी.डी.पवार आणि सहकारी प्रध्यापक

३. ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमुल्ये- प्रा.अरुण गायकवाड आणि सहकारी प्रध्यापक